आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१३ फेब्रुवारी २०२६ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- २५ लाख टन गहू आणि ५ लाख टन गहू उत्पादनं निर्यात करायला केंद्र सरकारची मंजुरी

- संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा संपन्न /दोन्ही सभागृहांचं कामकाज येत्या ९ मार्चपर्यंत स्थगित

- लोकसभेत राहुल गांधी यांच्याविरोधात हक्कभंग ठराव सरकार आणणार नाही, निशिकांत दुबे यांच्या ठरावावर सभापतींशी चर्चा करुन निर्णय घेणार

- माजी केंद्रीय कृषी राज्यमंत्री आणि रेल्वेमंत्री कान्हू चरण लेंका यांचं निधन

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये १ हजार ४८ अंकांची घसरण

**<><><><>**

देशांतर्गत बाजारात गव्हाचे दर स्थिर राहावेत आणि गहू उत्पादकांना चांगला परतावा मिळावा यादृष्टीनं केंद्र सरकारनं २५ लाख टन गहू आणि ५ लाख टन गव्हाचे पदार्थ निर्यात करायला मंजुरी दिली आहे. बाजारातली सध्याची उपलब्धता आणि दराची स्थिती यांचा व्यापक आढावा घेतल्यानंतर हा निर्णय घेतला असल्याचं केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं म्हटलं आहे.

यंदा रब्बी हंगामात गव्हाचं पेरणी क्षेत्र सुमारे सहा लाख एकरनं वाढलं. तर बाजारातला गव्हाचा साठा अंदाचे ७५ लाख टन, म्हणजे गेल्यावर्षीपेक्षा सुमारे ३२ लाख टन जास्त आहे. त्यामुळे या निर्णयानं शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढेल, असा विश्वास मंत्रालयानं व्यक्त केला आहे.

**<><><><>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्याच्या कामकाजाचा आज अखेरचा दिवस होता. आजच्या शेवटच्या दिवशीही लोकसभेत विरोधकांनी विविध मुद्द्यांवरून गदारोळ केल्याने कामकाज स्थगित करण्यात आलं असून दुसऱ्या टप्प्याचं कामकाज ९ मार्चला सुरू होणार आहे.

लोकसभेत आज सकाळी कामकाजाला सुरुवात झाली तेव्हा पीठासीन अधिकारी संध्या राय यांनी माजी खासदार दिवंगत भगवानदास राठोड यांच्या निधनाचा शोकप्रस्ताव मांडला. त्यानंतर सभागृहात दोन मिनिटांचं मौन पाळून राठोड यांना आदरांजली वाहण्यात आली. त्यानंतर सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात झाली. त्यानंतर काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, डीएमके सह अन्य विरोधी पक्षाच्या सदस्यांनी गदारोळ केल्याने कामकाज १२ वाजेपर्यंत स्थगित झालं. कामकाजाला पुन्हा सुरुवात झाल्यावरही गदारोळ सुरुच राहिल्यानं पीठासीन अधिकाऱ्यांनी सभागृहाचं कामकाज ९ मार्चपर्यंत स्थगित केलं.

**राज्यसभेतही** अर्थसंकल्पीय अधिवेशनच्या पहिल्या सत्राच्या अखेरच्या दिवशी सदस्यांनी विविध दस्तऐवज सभागृहाच्या पटलावर मांडले. राज्यसभेचे अध्यक्ष उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांनी राष्ट्रपतींचा संदेश सभागृहात वाचून दाखवला. दोन्ही सभागृहांच्या संयुक्त अधिवेशनात २८ जानेवारी रोजी केलेल्या अभिभाषणाबद्दल राज्यसभेच्या सदस्यांनी व्यक्त केलेल्या आभारदर्शक प्रस्तावाची नोंद राष्ट्रपतींनी घेतल्याचं संदेशात नमूद केलं. त्यानंतर राज्यसभेचंही कामकाज ९ मार्चपर्यंत तहकूब करण्यात आलं.

देशातल्या शेतकऱ्यांच्या एकूण एक समस्यांवर तोडगा काढण्यासाठी केंद्रसरकार सातत्याने प्रयत्न करीत असल्याचं प्रतिपादन केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान यांनी राज्यसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना केलं. शेतकऱ्यांसाठी कृषी पायाभूत सुविधा निधी स्थापन करण्यात आला असून ४४ हजार २४३ शेती सामुग्री केंद्र, २५ हजार ८५४ प्राथमिक प्रक्रीया केंद्र, १७ हजारापेक्षा जास्त गोदामं, आणि सुमारे ३ हजार शीतगृह उभारण्यात आली असल्याची माहिती त्यांनी दिली. यामुळे उत्पादनानंतर होणाऱ्या नुकसानीचं प्रमाण ५ ते १५ टक्क्यांनी कमी झालं असल्याचं त्यांनी सांगितलं. कडधान्य, डाळी उत्पादनात आत्मनिर्भरता गाठण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे असं ते म्हणाले.

**<><><><><>**

लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरुद्ध भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी मांडलेल्या वेगळ्या ठरावावर सभापतींशी चर्चा केल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल, अशी माहिती, केंद्रीय संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी आज बातमीदारांना दिली. हा ठराव विशेषाधिकार समितीकडे पाठवायचा की नितीमूल्य समितीकडे द्यायचा की थेट

सभागृहात चर्चेसाठी आणायचा याबाबत लवकरच निर्णय घेतला जाईल, असंही रिजिजू यांनी सांगितलं.

<><><><><>

जपानसोबतचे आर्थिक आणि सांस्कृतिक संबंध अधिक मजबूत करण्याचा मानस मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केला आहे. जपानच्या वाकायामा प्रांताचे राज्यपाल मियाझाकी इजुमी यांनी जपानच्या शिष्टमंडळासह आज मुंबईत  फडनवीस यांची भेट घेतली. त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्र आणि वाकायामा प्रांत यांच्यातले संबंध मैत्रीपूर्ण आहेत. तंत्रज्ञान, उत्पादन आणि सेवा उद्योग क्षेत्रात सहकार्य अधिक वाढवून हे संबंध येणाऱ्या काळात अधिक दृढ केले जातील, असं त्यांनी सांगितलं.

अफगाणिस्तानातल्या बामियानच्या गौतम बुद्धांच्या पुतळ्याच्या विध्वंसाला २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर नागपूर इथं त्या पुतळ्याची प्रतिकृती उभारण्याचा प्रस्ताव फडनवीस यांनी राज्यपालांना दिला. 'वाकायामा हे जपानमधलं महाराष्ट्राचं प्रवेशद्वार आहे' असं सांगत मियाझाकी इजुमी यांनी भविष्यातल्या सहकार्याबद्दल आशावाद व्यक्त केला.

<><><><><>

माजी केंद्रीय कृषी राज्यमंत्री आणि  रेल्वेमंत्री कान्हू चरण लेंका यांचं  आज सकाळी भुवनेश्वर इथं  निधन झालं.  ते ८६ वर्षांचे होते. कान्हू चरण लेंका यांनी १९८८ ते १९९४ पर्यंत राज्यसभेत ओडिशाचं  प्रतिनिधित्व केलं होतं. चौद्वार मतदारसंघातून ते चार वेळा ओडिशाच्या विधानसभेवर निवडून आले होते. तसंच ओडिशाच्या प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केलं  होतं.

<><><><><>

आयटी क्षेत्रातल्या समभागांच्या विक्रीचा परिणाम आजही शेअर बाजारांवर दिसून आला. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर १ हजार ४८ अंकांची घसरण झाली आणि तो ८२ हजार ६२७ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३३६ अंकांची घसरण  नोंदवत २५ हजार ४७१ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

देशात लखपती दीदींची संख्या ६ कोटीवर नेण्याचं उद्दिष्ट ठेवणाऱ्या पीएम राहत योजनेला आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मंजुरी दिली. नवी दिल्लीतल्या सरकारी

कार्यालयांच्या 'सेवा तीर्थ' या नवीन संकुल परिसराचं उद्घाटन आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालं. प्रधानमंत्र्यांचं कार्यालय या संकुलात असून तिथं गेल्यावर प्रधानमंत्र्यांनी पहिली स्वाक्षरी या योजनेच्या मंजुरीवर केली. कृषी पायाभूत सुविधा निधीत दुप्पट वाढ करण्याच्या तसंच शेतकरी, महिला, युवा आणि दुर्बल घटकांच्या कल्याणासंदर्भात विविध निर्णयांच्या फाईलवर त्यांनी स्वाक्षरी केली.

सेवा तीर्थ संकुलात, प्रधानमंत्री कार्यालय, राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालय आणि कॅबिनेट सचिवालय आहे. हे नवीन संकुल आधुनिक सोयी-सुविधांनी सुसज्ज आहे. कर्तव्य भवन-1 आणि 2 मध्ये अनेक प्रमुख खात्यांची कार्यालयं आहेत.

**<><><><><>**

केवळ आवाजाच्या माध्यमातून जग जोडणाऱ्या प्रसारणकर्मींबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी १३ फेब्रुवारी हा दिवस दरवर्षी रेडियो दिवस म्हणून साजरा केला जातो. स्पॅनिश रेडियो अकादमीच्या विनंतीवरुन नोव्हेंबर २०११ मधे युनेस्कोनं हा निर्णय घेतला, आणि डिसेंबर २०१२मधे संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेनं त्यावर मोहोर उमटवली. रेडियो तंत्रज्ञानाला डिजिटल तंत्रज्ञानाची आणि इंटरनेटची जोड मिळाल्यावर आवाजाचं हे माध्यम अधिकाधिक श्रोत्यांपर्यंत पोहचत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा या माध्यमातला वापर हे एक साधन राहील, ते मानवी आवाजाची जागा घेऊ शकणार नाही अशी यंदाच्या रेडियो दिनाची संकल्पना आहे. सार्वजनिक प्रसारण सेवेत ज्ञान, माहिती आणि मनोरंजनाचं माध्यम म्हणून आकाशवाणी गेली अनेक वर्ष चोख कामगिरी बजावत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी रेडिओ दिना निमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

आकाशवाणीच्या वतीने छत्तीसगडमध्ये रायपूर इथं आज जागतिक रेडिओ दिन परिसंवादाचं आयोजन करण्यात आलं. आकाशवाणी मुंबई आणि मुंबई दूरदर्शन यांनी आकाशवाणी मुंबईच्या सभागृहात व्हॉक्स अँड व्हाईब्ज हा पाश्चात्य संगीताचा कार्यक्रम आयोजित केला. आकाशवाणी मुंबईचे गिटारवादक अमित रॉय, पायल मलिक, तसंच तेजस मेनन आणि सहकाऱ्यांनी यावेळी सादरीकरण केलं. या कार्यक्रमाची संपादित आवृत्ती येत्या बुधवारी रात्री साडेनऊ वाजता आकाशवाणी मुंबई च्या FM Rainbow वाहिनी वर प्रसारित केली जाईल.

**<><><><><>**

टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज कोलंबो इथं ब गटातल्या सामन्यात झिम्बाब्वेनं ऑस्ट्रेलियावर २३ धावांनी मात केली. प्रथम फलंदाजी करताना झिम्बाब्वेनं २० षटकात २ गडी गमावून १६९ धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा डाव ३ चेंडू बाकी असतानाच १४६ धावांवर आटोपला.

ड गटात आज नवी दिल्लीच्या अरुण जेटली मैदानावर झालेल्या सामन्यात यूएईने कॅनडावर ५ गडी राखून विजय मिळवला. कॅनडानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला होता. त्यांना २० षटकात १५० धावा करता आल्या. यूएईने विसाव्या षटकाच्या चौथ्या चेंडूत हे आव्हान पूर्ण केलं. चेन्नईत अ गटात अमेरिका आणि नेदरलँड यांच्यात सामना सुरू आहे.

महिला क्रिकेटमध्ये बँकॉक इथे सुरू झालेल्या आशिया चषक रायझिंग स्टार्स क्रिकेट स्पर्धेत संयुक्त अरब अमिरातीच्या संघाने भारताच्या अ संघाचा ७ गडी राखून पराभव केला. भारत अ संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली. भारताच्या अ संघाला २० षटकांत १३० धावा करता आल्या. संयुक्त अरब अमिरातीने विसाव्या षटकाच्या दुसऱ्या चेंडुत ७ गडी राखत १३१ धावा केल्या.

या स्पर्धेत आठ संघ सहभागी होणार असून ते दोन गटात विभागण्यात आले आहेत. प्रत्येक गटातला संघ एकमेकांबरोबर एकदा सामना खेळेल. दोन्ही गटातले अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत पोहोचतील.

भारतीय महिला संघाचा ऑस्ट्रेलिया दौरा सुरू झाला असून आज त्यांचा प्रदर्शनाचा सामना गव्हर्नर जनरल इलेव्हन संघाशी झाला. या सामन्यात भारताने ५ गडी राखून विजय मिळवला.

**//<><><><><>//**